**L. A. BILL No. XXXII OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२.**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९७५ चा महा. ४४.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(शा.म.मु.) एचबी १०४८–१ (१०४५–७-२०२३)

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ६अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ६अ मधील, खंड (तीन) व (चार) वगळण्यात येतील.

१९७५ चा महा. ४४.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील,—

(१) पोट-कलम (३) मधील, खंड (अ-१) मधील, पहिले, दुसरे व तिसरे परंतुक वगळण्यात येईल.

(२) पोट-कलम (५-ब) वगळण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे संरक्षण व जतन करण्याच्या प्रयोजनार्थ, झाडे तोडण्याचे नियमन करून आणि त्या क्षेत्रांमध्ये समुचित प्रमाणात नवीन झाडे लावण्याची तरतूद करण्याकरिता, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. ४४), अधिनियमित करण्यात आलेला आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६अ मध्ये, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाच्या कर्तव्यांची तरतूद केली आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, झाडे तोडण्यावरील निर्बंधांची तरतूद केली आहे. उक्त कलम ८ च्या पोट-कलम (३) च्या खंड (अ-१) मधील परंतुकात अशी तरतूद केली आहे की, पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशेपेक्षा अधिक झाडे पाडण्याच्या संबंधातील आणि पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडण्याच्या संबंधातील अर्ज, वृक्ष प्राधिकरणाकडून किंवा वृक्ष अधिकाऱ्याकडून महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे पाठविण्यात येतील.

२. राज्यातील नागरी क्षेत्रांमधील शहरीकरण व औद्योगिकरणाचा वाढता वेग लक्षात घेता, विकासाला चालना देण्यासाठी व महाराष्ट्र राज्यात, गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यासाठी, " उद्योग करण्याची सुलभता " (इज ऑफ डुईंग बिजनेस) हा एक सर्वोत्तम मार्ग आहे. केंद्र सरकार देखील अधिकारांचे विकेंद्रीकरण, परवान्यांची संख्या कमी करणे, विविध क्षेत्रांमध्ये कराराननिविष्ट कालावधीच्या आत परवानग्या देणे यांमार्फत " उद्योग करण्याची सुलभता " यास सातत्याने चालना देत आहे.

३. या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे अर्ज न पाठवता, सर्व प्रकारची झाडे पाडण्यासाठी परवानगी देण्याकरिता स्थानिक वृक्ष प्राधिकरणाला अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे. म्हणून, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ याची कलमे ६अ व ८ यांमध्ये, सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २४ जुलै, २०२३.

**एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२–महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.

**[महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यातील उतारे]**

**(सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४)**

**१.** ते **५.** * * * *

**६.** (१) व (२) * * * *

महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये.

**६अ.** संबद्ध अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, आणि राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही विशेष किंवा सर्वसाधारण निदेशांस अधीन राहून, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, पुढील गोष्टींसाठी जबाबदार असेल :—

(एक) व (दोन) * * * *

(तीन) पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशेपेक्षा अधिक झाडे तोडण्याच्या संबंधात, वृक्ष प्राधिकरणाने त्याच्याकडे निर्दिष्ट केलेल्या अर्जांवर निर्णय घेणे ;

(चार) पुरातन (हेरीटेज) वृक्ष तोडण्याच्या संबंधात, वृक्ष प्राधिकरणाने त्यांच्याकडे निर्दिष्ट केलेल्या अर्जांवर निर्णय घेणे ;

(पाच) * * * *

**७.** * * * *

झाडे तोडण्यावरील निर्बंध.

**८.** (१) व (२) * * * *

(३) (अ) * * * *

(अ-१) पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेला अधिकारी किंवा यथास्थिति, वृक्ष प्राधिकरण अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत सशर्त किंवा विनाशर्त परवानगी देईल किंवा ती नाकारील. " ;

" परंतु, जेव्हा पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशे पेक्षा अधिक झाडे पाडण्याचे प्रस्तावित असेल तेव्हा, अशा बाबतीत, वृक्ष प्राधिकरण, सदर प्रकरण, त्याच्या अहवालासह व शिफारशींसह महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील :

परंतु आणखी असे की, जेव्हा पाडण्याचे प्रस्तावित केलेले झाड हे, पुरातन (हेरीटेज) वृक्ष असेल तेव्हा, अशा बाबतीत, वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, सदर प्रकरण, त्याच्या अहवालासह व शिफारशींसह, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील :

परंतु तसेच, वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, पाडावयाच्या झाडांची संख्या दोनशे पेक्षा कमी ठेवता यावी म्हणून भूविकास किंवा अन्य कोणताही प्रकल्प, लहान-लहान भागांमध्ये उप-विभाजित केला जाणार नाही याची खात्री करील. " ;

(ब) * * * *

(४) व (५) * * * *

(५अ) * * * *

(५ब) (अ) वृक्ष प्राधिकरण, पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशेपेक्षा अधिक झाडे पाडण्यासाठी प्राप्त झालेला अर्ज, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील.

(ब) वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडण्याचा अर्ज महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील.

(क) महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, वृक्ष प्राधिकरणाने किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकाऱ्याने खंड (अ) व (ब) अन्वये त्यांच्याकडे निर्दिष्ट केलेला अर्ज, वृक्ष प्राधिकरणाकडून किंवा वृक्ष अधिकाऱ्याकडून संदर्भ प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीत, शर्तीसह किंवा शर्तीशिवाय, एकतर मान्य करील अथवा तो नाकारू शकेल.

(ड) जेव्हा महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, झाडे पाडण्याला परवानगी देईल तेव्हा, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करणे आवश्यक असल्याचे वाटत असेल तर, वृक्ष प्राधिकरण, निर्णय कळविल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी त्याच्या कारणांसह महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाला विनंती करू शकेल. त्यानंतर अशा विनंतीवर, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकारणाकडून दहा दिवसांच्या आत निर्णय घेण्यात येईल.

(५क) * * * *

(६) * * * *

**९.** ते **२२.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२.]**

**[महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई